सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २४० | शनिवार, दि. २३ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ Ct सोने ९९.५०% | ₹ १५२५०० |
| २२ Ct सोने ९१.६०% | ₹ १४२५०० |
| १८ Ct सोने ७५.००% | ₹ ११७५०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २६५०/- |

भाव प्रती १० ग्राम

**अभीष्टचिंतन**



श्री. मनोज सोनार
अमळनेर

## दिनविशेष
२३ मे

- जीवन विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी विधेयक मंजूर.
- बचेंद्री पाल यांनी दुपारी १.०९ वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) एव्हरेस्ट शिखर सर केले.
- 'जावा' प्रोग्रामिंग लँग्वेज ची पहिली आवृत्ती प्रकाशीत केली गेली.
- माऊंट एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर सर्वप्रथम सर करणाऱ्या तेनसिंग नोर्गे यांचे नातू ताशी तेनसिंग यांनी माऊंट एव्हरेस्ट सर केले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## दै. ग्लोबल महातेजचा दणका!

# मुदत बाह्य शीतपेयाच्या तक्रारीनंतर नमुने पाठविले तपासणीला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात मुदतबाह्य शीतपेये व ताक विक्रीचा प्रकार समोर आल्यानंतर याबाबत दैनिक ग्लोबल महातेज वृत्तपत्राने बातमी प्रकाशित केले असता प्रशासनावर टीका होत असतानाच, संबंधित एका मुदतबाह्य शीतपेया बाबत एका तरुणाने केलेल्या ऑनलाईन तक्रारीवर अखेर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. अमळनेर धुळे रोडवरील मंगरूळ येथील गायत्री टी सेंटर अँड जनरल स्टोअर येथे करण्यात आलेल्या तपासणीत मसाला ताकाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २१ मे २०२६ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी संबंधित आस्थापनाची तपासणी केली. यावेळी दुकानात बापू डेअरीचे मसाला ताक विक्रीस ठेवलेले आढळले. पाउचवरील उत्पादन दिनांक व 'use by date' तपासण्यात आली असता ती विहित मुदतीत असल्याचे प्राथमिक तपासणीत दिसून आले.

तथापि, संबंधित अन्नपदार्थाचा नमुना अधिकृतरीत्या घेऊन तो प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आला आहे. या अहवालानंतरच ताकाच्या गुणवत्तेबाबत अंतिम निष्कर्ष स्पष्ट होणार आहे. सध्या हा अहवाल प्रलंबित असल्याची माहिती अन्नसुरक्षा अधिकारी आकाश बोराडे व किशोर बाविस्कर यांनी दिली

दरम्यान, संबंधित आस्थापनाकडे अन्न व्यवसाय नोंदणी नसल्याचेही तपासणीत निदर्शनास आले असून त्याबाबत पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पूर्वी समोर आलेल्या मुदतबाह्य शीतपेये व ताक विक्रीच्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, तक्रार केल्याशिवाय प्रशासन हलत नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये अधिक कडक आणि नियमित तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणतेही अन्नपदार्थ किंवा पेय खरेदी करताना त्यावरील उत्पादन दिनांक व मुदत समाप्ती तारीख तपासूनच खरेदी करावी

> ***खाद्यपदार्थ, शीतपेये व पाण्याच्या बाटल्यांचे विक्रेते यांनी कृपया एक्सपायरी किंवा मुदतबाह्य (आऊटडेटेड) माल विकू नये. असे केल्यास आपल्या नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होतो. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध योग्य ती कठोर कारवाई करण्यात येईल.***
> ***– मयूर भंगाळे, प्रांताधिकारी***



मुदतबाह्य शीतपेये, ताक पाऊच, बंद पाणी बॉटलची सर्रास विक्री

आरोग्याशी होणाऱ्या खेळाचा जागरूक ग्राहकाने दुकानदारास विचारला जाब; प्रशासन सुस्तच!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील किराणा दुकाने, पानटपऱ्या व छोट्या हॉटेलमधून मुदतबाह्य शीतपेयांसह बंद पाणी बॉटलची सर्रास विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तालुक्यातील एका चहाच्या दुकानातून मुदत संपलेल्या ताकाची विक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आल्याने या परिस्थितीची गंभीरता

*दै. ग्लोबल महातेज वृत्तपत्रात दि. २१ रोजी प्रसिद्ध झालेले वृत्त*

# भरधाव वाळूच्या डंपरने शिरूड येथे पाईपलाईन फोडली

## ऐन उन्हाळ्यात शेकडो लिटर पाणी वाया

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात सध्या सुरू असलेल्या बेकायदा वाळू उपसा आणि भरधाव अवजड वाहतुकीमुळे नागरिकांचे हाल होत असतानाच, तालुक्यातील शिरूड येथे घडलेल्या घटनेने परिस्थितीचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित केले आहे. भरधाव वेगाने धावणाऱ्या वाळूने भरलेल्या डंपरने मुख्य रस्त्यालगतची पाण्याची पाईपलाईन फोडल्याने शेकडो लिटर पाणी वाया गेले असून परिसरात मोठा चिखल निर्माण झाला.

सदर रस्ता अनेक गावांना जोडणारा प्रमुख मार्ग असल्याने या घटनेचा फटका वाहतुकीलाही बसला. रस्त्यावर पाणी साचून चिखल झाल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागली, याबाबत स्थानिक नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

घटनेची माहिती मिळताच ग्रामपंचायतीने तातडीने पावले उचलत रात्री उशिरापर्यंत काम करून पाईपलाईन दुरुस्त केली. खड्डा खोदून गळती रोखण्यात आली आणि पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत करण्यात आला. मात्र, या घटनेने प्रशासनाच्या नियंत्रणक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, अमळनेर तालुक्यात सध्या वाळू उपशाचा मुद्दा चांगलाच ऐरणीवर आला आहे. अनेक ठिकाणी बेसुमार व बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असून, त्यासाठी क्षमतेपेक्षा अधिक वाळू भरून धावणारे डंपर रस्त्यावरून बेधडक फिरताना दिसत आहेत. शहरातील रस्त्यांचा अक्षरशः बोजवारा उडाल्यानंतर आता या अवजड वाहनांनी ग्रामीण



भागातील रस्त्यांचाही चुराडा सुरू केला आहे. तर शहरातील रस्ते दाबले जात असून उंचवटे तयार होत आहे.

विशेष म्हणजे, या डंपरच्या भरधाव वेगामुळे अपघातांचा धोका वाढला असून पाईपलाईन फोडण्यासारख्या घटना वारंवार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा अवजड वाहनांवर तात्काळ नियंत्रण आणावे, बेकायदेशीर वाळू उपसा थांबवावा आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

# देशी गायींसाठी 'लाडकी गाय योजना'

## दरमहा १,५०० रुपये तर संकरित गायींना ७५% अनुदान!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गोशाळांमधील देशी गायींचे संगोपन आणि संवर्धन करण्यासाठी राज्य शासनाने 'लाडकी गाय योजना' सुरू केली आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून नोंदणीकृत गोशाळेतील गायींना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांचे अनुदान दिले जाते. तुलनेत संकरित गायींना ५० ते ७५ टयांपर्यंत अनुदान दिले जात असल्याने देशी गायींच्या संवर्धनासाठी अनुदानात वाढ करण्याची मागणी गो-पालकांनी केली आहे.

राज्यात २० मे हा दिवस राज्यस्तरीय पशुसंवर्धन दिन म्हणून साजरा केला जातो. नाशिक जिल्ह्यात ८ लाख ९५ हजार गायवर्ग संवर्गातील गुरे आहेत. पशुसंवर्धन विभागाने नुकतीच पशुगणना केली. त्यानुसार जिल्ह्यात २ लाख



२१ हजार म्हशी आहेत. याचा अर्थ संकरित गायी देशी गायी व म्हशींचा दुधासाठी उपयोग होतो. त्यातही संकरित गायींचे प्रमाण अधिक असल्याने त्यांच्या माध्यमातून दुधाची मागणी पूर्ण केली जाते. जिल्ह्यात गौर, साहिवाल आणि खिल्लार या तीन प्रकारच्या गायींचे प्रमाण जास्त आहे.गीर गायी वर्षभर दूध देऊ शकतात. या तुलनेत देशी गायी तीन ते चार महिने दूध देतात. त्याचे प्रमाणही कमी असते. वासरू मृत झाल्यास या गायीचे दूध तत्काळ बंद होते. त्यामुळे देशी गायी वापराचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शास शासनाने गोशाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला.

नोंदणीकृत संस्थांनी गायींचे संवर्धन केल्यास त्यांना प्रत्येक महिन्याला पंधराशे रुपये अनुदान मिळते. नाशिक जिल्ह्यात १७ संस्थांनी आतापर्यंत नोंदणी केली आहे. त्यांच्याकडे साधारणतः ४०० गायींचे संगोपन केले जाते. त्यांची संख्या वाढवायची असल्यास शेतकऱ्यांनाही प्रोत्साहित केले पाहिजे. त्यांच्याकडे असलेल्या देशी गायींना अनुदान दिल्यास यातून देशी गायींचे संवर्धन होईल. मात्र, संकरित गायींचे प्रमाण वाढवण्यासाठी शासन ५० ते ७५ टयांपर्यंत अनुदान देत असल्याने शेतकऱ्यांचा कल त्यांच्याकडेच वाढला आहे. परिणामी, देशी गायींचे प्रमाण कमी होताना दिसते.अनुदानाच्या अटींमध्ये शासनाने काही बदल केले आहेत. शेतकऱ्यांना भाकड जनावरे सांभाळणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना अनुदान मिळत नाही. शासनाने याचा विचार करून अटींमध्ये बदल केला तर गायीचे संवर्धन होईल. पांजरपोळच्या विविध प्रकल्पांमध्ये सुमारे १७०० गायी आहेत.

# शेतकी संघ निवडणुकीत उमेदवारांना चिन्हांचे वाटप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः तालुका शेतकरी सहकारी संघाच्या निवडणुकीत दि. २१ रोजी उमेदवारांना चिन्हांचे वाटप होऊन अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली.

तिन्ही पॅनलमधील उमेदवारांना समान चिन्ह देण्यात आले आहेत. सकाळी ११ वाजता सहाय्यक निबंधक कार्यालयात ही प्रक्रिया पार पडली. चिन्ह मिळताच उमेदवारांनी सायंकाळपासूनच प्रचारास प्रारंभ केला. राष्ट्रवादी काँग्रेसने माजी मंत्री तथा आ. अनिलदादा पाटील व माजी आ. कृषिभूषण साहेबराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहकार पॅनल रिंगणात उतरविले असून यात १५ उमेदवारांचा समावेश आहे. तर भाजपाने खासदार स्मिताताई वाघ यांच्या नेतृत्वाखाली किसान विकास पॅनल गठीत केले असून यात १४ उमेदवार दिले आहेत. महिला राखीव गटात या पॅनेलने एकच उमेदवार दिला आहे. तर काँग्रेस पक्षाने प्रा. सुभाष पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी पॅनल जाहीर केले.

असून या पॅनलने सोसायटी मतदारसंघात एकही उमेदवार दिला नसल्याने १० उमेदवारांचे पॅनल जाहीर केले आहे. सदर निवडणुकीत वरील तीन पॅनलमध्ये तिरंगी लढतीचे चित्र

**पान २ वर**

# अमळनेरचे सुपुत्र कौस्तुभ जोशी यांना "सरदार पटेल युनिटी अवॉर्ड"

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर येथील प्रतिष्ठीत व्यावसायिक श्री. अनिलदादा जोशी (अनिल ऑटो सेंटर) यांचे ज्येष्ठ सुपुत्र आणि तरुण उद्योजक कौस्तुभ अनिल जोशी (व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे) यांनी उद्योग क्षेत्रात मानाचा तुरा रोवला आहे. कौस्तुभ जोशी यांच्या 'टॉक्सिटा इनोव्हेशन प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीला भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालयाच्या वतीने या वर्षाचा अत्यंत प्रतिष्ठेचा "बेस्ट इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग कंपनी ऑफ द इयर २०२६" म्हणजेच "सरदार पटेल युनिटी अवॉर्ड" दि.२१ रोजी खासदार हेमा मालिनी यांच्या हस्ते शांग्री लास इरोज नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. त्यांच्या या उत्तुंग यशामुळे अमळनेरसह संपूर्ण खान्देशाचे नाव राष्ट्रीय पातळीवर उंचावले आहे.



***अमळनेर : खासदार हेमामालिनी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारतांना कौस्तुभ जोशी.***

कौस्तुभ जोशी यांनी वर्ष २०१९ पासून इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपल्या नाविन्यपूर्ण कल्पनांच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी करण्यास सुरुवात केली. त्यांच्या याच उत्कृष्ट आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल केंद्र सरकारकडून सातत्याने घेतली जात आहे. यापूर्वीही वर्ष २०२४ मध्ये त्यांना एमएसएमई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) मंत्रालयातर्फे राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यानंतर आता पुन्हा २०२६ मध्ये त्यांच्या कंपनीला हा सर्वोच्च बहुमान मिळाला आहे.

पुणे येथून कार्यरत असलेल्या 'टॉक्सिटा इनोव्हेशन प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीने कौस्तुभ जोशी यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत कमी कालावधीत मोठी झेप घेतली आहे. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग क्षेत्रात उत्कृष्ट गुणवत्ता, नाविन्यता आणि देशाच्या उभारणीत दिलेल्या योगदानाबद्दल भारत सरकारने या कंपनीला "बेस्ट इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग कंपनी ऑफ द इयर" म्हणून गौरविले आहे.

अमळनेर येथील एका मध्यमवर्गीय व्यावसायिक कुटुंबातून पुढे येत, कौस्तुभ यांनी आपल्या कष्टाच्या आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर कॉर्पोरेट जगतात निर्माण केलेले स्थान तरुणांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे वडील श्री. अनिलदादा जोशी, जोशी कुटुंबिय आणि कौस्तुभ जोशी यांच्यावर संपूर्ण अमळनेर व पुणे परिसरातून अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# गुरुजींना बसताहेत 'जनगणने'साठी चटके!

## यंदा उन्हाळी सुटीवर विरजण पडल्याने शिक्षकांच्या पदरी निराशा

**रजनीकांत पाटील : ग्लोबल महातेज**

अमळनेर : उन्हाळ्याच्या सुटीत पर्यटनाचा आणि कौटुंबिक सोहळ्यांचा बेत आखणाऱ्या शिक्षकांच्या पदरी निराशा निर्माण झाली आहे. यंदा उन्हाळी सुटीत शिक्षकांना जनगणनेच्या कामाला प्राधान्य द्यावे लागत असून, प्रशासनाने १६ मे ते १५ जून २०२६ या कालावधीत शिक्षकांना 'मुख्यालय न सोडण्याची' सक्त सूचना दिली आहे. त्यामुळे 'गुरुजीं'च्या सुटीवर यंदा पूर्णपणे विरजण पडले आहे. त्यामुळे शिक्षक वर्गात 'कभी खुशी, कभी गम' असे वातावरण पाहावयास मिळत आहे.

दि. ३० एप्रिल रोजी शैक्षणिक सत्र संपले. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून शाळांना सुटी जाहीर



झाली. मात्र, यंदा भारतीय जनगणना आयोगाने 'डिजिटल जनगणना' करण्याचा निर्णय घेतला आहे. या राष्ट्रीय कामासाठी जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि खासगी अनुदानित सेवा शाळांमधील शिक्षकांच्या अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. एप्रिल आणि मे महिन्यापासूनच या कामासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण सुरू होते. शैक्षणिक कामासह अशा कामामुळे शिक्षकांचा ताण वाढला आहे.

**दुहेरी कात्रीत शिक्षक**

एकीकडे जनगणनेचे काम आणि दुसरीकडे शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करण्याची कसरत, अशा दुहेरी कात्रीत शिक्षक अडकले आहेत. मे महिन्यातील कडाक्याच्या उन्हात ही कामे पूर्ण करताना शिक्षकांची चांगलीच दमछाक होणार आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे शिक्षकांमध्येही नाराजीचा सूर उमटत आहे. नवे सत्र जूनच्या शेवटच्या आठवड्यात सुरू होणार असले, तरी शिक्षकांसाठी सुटी केवळ कागदावरच आहे.

# संपादकीय

## ‘एआय’चा गळा घोटणारे नवे शस्त्र– ‘किल स्विच’

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे फक्त स्मार्ट चॅटबॉट किंवा ऑटोमेशन नाही. ती आता निर्णय घेणारी, माहिती निर्माण करणारी, निरीक्षण करणारी आणि मानवी वर्तनावर प्रभाव टाकणारी शक्ती बनत आहे. संगणक आणि यंत्रांना माणसासारखे विचार करणे, शिकणे आणि निर्णय घेणे शिकविणारी ही तंत्रज्ञान पद्धती वेगाने वाढत आहे. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, उद्योग, न्यायव्यवस्था अशा अनेक क्षेत्रांत तिचा वापर होतोय. आज जगासमोर सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा उभा आहे की, “एआय कोणाच्या नियंत्रणाखाली असणार आणि ते मानवजातीच्या हितासाठी काम करणार का?” – कारण तंत्रज्ञान जितके सामर्थ्यवान बनते, तितकी त्याच्या चुकीच्या वापराची भीतीही वाढते. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने बनावट चित्रे, खोटे व्हिडिओ, दिशाभूल करणारी माहिती आणि मानवी निर्णयांवर प्रभाव टाकणाऱ्या प्रणाली निर्माण होत आहेत. त्यामुळे सुरक्षित आणि नैतिक ‘एआय’ची गरज आता पूर्वीपेक्षा अधिक तीव्र झाली आहे. याच पार्श्वभूमीवर ‘किल स्विच गव्हर्नन्स मॉडेल’ ही नवी संकल्पना महत्त्वाची ठरत आहे. या मॉडेलनुसार एखादी एआय प्रणाली मानवजातीसाठी धोकादायक ठरत असल्यास तिचे संगणकीय सामर्थ्य त्वरित बंद केले जाऊ शकते. म्हणजेच, एआय सर्व्हर, क्लाउड नेटवर्क, डेटा सेंटर्स किंवा जीपीयू निष्क्रिय करून ती प्रणाली थांबवता येईल. साध्या भाषेत सांगायचे तर, ‘एआय’ला आवश्यक असलेली ऊर्जा आणि संगणकीय शक्ती बंद केली तर त्याचे कार्यही थांबेल.

पूर्वी एआयचे नियंत्रण मुख्यत: कोड लिहिणाऱ्या किंवा मॉडेल विकसित करणाऱ्या कंपन्यांकडे होते. आता मात्र ‘कॉम्प्युटर कंट्रोल’ म्हणजे संगणकीय शक्ती पुरवणाऱ्या संस्थांकडे अंतिम नियंत्रण जाऊ शकते. आधुनिक एआय प्रणालींना प्रचंड संगणकीय क्षमता लागते. हजारो जीपीयू, अत्याधुनिक डेटा सेंटर्स, सतत चालणारे क्लाउड नेटवर्क याशिवाय प्रगत एआय कार्य करू शकत नाही. ही सुविधा असणाऱ्यांकडे एआय थांबवण्याची ताकद असते. या मॉडेलचा सर्वात मोठा फायदा म्हणजे सुरक्षा. जर एआय चुकीची माहिती पसरवत असेल, सायबर हल्ल्यांना मदत करत असेल किंवा मानवी नियंत्रणाबाहेर जात असेल, तर एआयला त्वरित थांबवणे शक्य होईल. भविष्यात जैविक शास्त्रनिर्मिती, आर्थिक फसवणूक किंवा डिजिटल युद्धामध्ये एआयचा गैरवापर होण्याची भीती व्यक्त केली जाते. अशा वेळी ‘किल स्विच’ ही यंत्रणा आपत्कालीन सुरक्षाकवच ठरू शकते. ‘किल स्विच’ मॉडेलमुळे बाह्य नियंत्रणाची एक नवी व्यवस्था निर्माण होते. तथापि, या मॉडेलवर गंभीर प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. सर्वात मोठा प्रश्न म्हणजे अंतिम निर्णय कोण घेणार? एखादी एआय प्रणाली धोकादायक आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार एका खाजगी कंपनीकडे असावा का? जर काही मोजक्या कंपन्यांकडे इंटरनेट, क्लाउड आणि संगणकीय शक्तीचे नियंत्रण असेल तर डिजिटल सत्तेचे केंद्रीकरण वाढू शकते. भविष्यात काही तंत्रज्ञान कंपन्या सरकारांपेक्षाही अधिक प्रभावशाली बनण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पारदर्शकता. ‘हानी’ किंवा ‘धोका’ याची व्याख्या नेमकी काय असणार? चुकीची माहिती, राजकीय मतभेद, आर्थिक संकट किंवा सुरक्षा धोका – यातील सीमारेषा अनेकदा अस्पष्ट असतात. स्पष्ट निकष नसतील तर ‘किल स्विच’चा गैरवापर होण्याची भीती निर्माण होते. काही वेळा विरोधी विचार दडपण्यासाठी किंवा स्पर्धकांना रोखण्यासाठीही अशा यंत्रणांचा वापर होऊ शकतो.यामुळे ‘डिजिटल सार्वभौमत्व’ हा नवा प्रश्न समोर येतो. एआय प्रणाली जागतिक स्वरूपाच्या असल्या तरी त्यांचे नियंत्रण काही देशांतील कंपन्यांकडे केंद्रित होत आहे. भविष्यात संगणकीय शक्ती तेल, वीज किंवा अणुऊर्जेसारखी सामरिक संपत्ती मानली जाऊ शकते. ज्यांच्याकडे कॉम्प्युटर शक्ती असेल तेच भविष्यातील एआयचे नियम ठरवू शकतील. म्हणूनच एआयचे भवितव्य केवळ तांत्रिक प्रगतीवर अवलंबून नसेल, तर नैतिकता, पारदर्शकता आणि मानवी मूल्यांवरही ठरणार आहे. ‘किल स्विच’ ही संकल्पना मानवजातीच्या सुरक्षेसाठी उपयुक्त ठरू शकते; परंतु तिचा वापर लोकशाही, न्याय आणि पारदर्शकतेच्या चौकटीतच झाला पाहिजे.

# रोमचे सोने, पैठणचे रेशीम आणि देवगिरीचा घात!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रोमन साम्राज्यातले सगळे सोने–नाणे अचानक गायब का झाले होते आणि त्याचा आपल्या महाराष्ट्रातील पैठण शहराशी काय संबंध होता, हे ऐकले तर तुमचे डोळे पांढरे होतील.

भारतात पूर्वी सोन्याचा धूर निघत होता असे आपण ऐकतो, तेव्हा काही जण त्याची टिंगल टवाळी करतात. पण इतिहास चाळला की असे काही धक्कादायक सत्य समोर येते, ज्याने ऊर अभिमानाने भरून येतो आणि सोबतच एक मोठा धडाही मिळतो.हा सगळा खेळ सुरू झाला एका महागातल्या फॅशनमुळे. त्या काळात रोमन साम्राज्यात भारतीय रेशमी कपडे वापरण्याचे प्रचंड फॅड आले होते. तिथल्या राजघराण्यात आणि सरदारांमध्ये रेशमी कपडे घालणे हे ऐश्वर्याचे, श्रीमंतीचे लक्षण मानले जात होते. प्रत्येक रोमन सरदाराला भारतीय रेशीम हवेच होते.पण यात एक गोम होती. आपले भारतीय व्यापारी काही साधे नव्हते. त्यांनी रोमन लोकांना स्पष्ट सांगितले होते, कापड हवे असेल तर बदल्यात फक्त आणि फक्त शुद्ध सोन्याची नाणी द्यावी लागतील.आता विचार करा, एका बाजूने कापड जात होते आणि दुसऱ्या बाजूने रोमला जाणाऱ्या जहाजांमधून सोन्याचे ढीगच्या ढीग भारतात येत होते. याचा परिणाम काय झाला माहित आहे?

रोमन साम्राज्यातील सोने वेगाने संपू लागले. तिथली तिजोरी रिकामी होऊ लागली. शेवटी तिथल्या प्रमुख सरदाराला घाबरून एक मोठा निर्णय घ्यावा लागला. त्याने ‘सोन्याच्या बदल्यात रेशीम’ या व्यापारावर थेट बंदीच घालून टाकली. आपल्या पूर्वजांनी व्यापाराच्या जोरावर जगातील सर्वात मोठ्या साम्राज्याला गुडघ्यावर आणले होते.

पण हे अथांग सोने भारतात नक्की जात कुठे होते? या सोन्याचे पुढे काय झाले?

या संपूर्ण व्यापाराचे मुख्य केंद्र होते आपल्या महाराष्ट्रातील पैठण. होय, तलम आणि सुबक रेशमाच्या कापडासाठी पैठण जगभर प्रसिद्ध होते. साहजिकच, रोममधून आलेले सोन्याचे डोंगर पैठणमध्ये जमा होत होते. पैठण वैभव आणि संपत्तीने ओसंडून वाहत होते.पैठण हे यादवांच्या बलाढ्य देवगिरी साम्राज्याचा भाग होते. देवगिरीचा



तो अजिंक्य किल्ला पाठीशी असल्याने आपले विणकर आणि व्यापारी निर्धास्त होते. सुरक्षित वातावरणात हा व्यवसाय प्रचंड भरभराटीला आला होता.पण म्हणतात ना, संपत्ती जितकी वाढते, तितकीच शत्रूची वाईट नजरही तिच्यावर पडते. पैठणच्या या अथांग सोन्याची बातमी मध्य पूर्वेतील लुटारू जमातींपर्यंत पोहोचली. आणि मग जे घडले, त्याने इतिहास कायमचा बदलून गेला.अल्लाउद्दीन खिलजीने जेव्हा या भागावर हल्ला केला, तेव्हा त्याने पैठण आणि देवगिरीमधून इतके सोने, हिरे आणि माणके लुटली की ती वाहून नेण्यासाठी कित्येक हत्ती कमी पडले होते. कित्येक हत्तींवर लादून आपले सोने देशाबाहेर गेले.

पण एक अजिंक्य साम्राज्य एका रात्रीत असे कसे लुटले गेले? देवगिरीचा तो अभेद्य किल्ला काय करत होता?

देवगिरी निर्धास्त होते. देवगिरी किल्ला अभेद्य होता. किल्ल्यात भरपूर अन्नधान्य साठवून ठेवलेले होते. किल्ल्याला वेढा पडला तरी चिंता नव्हती.पण राज्यातील व्यवस्था सडलेली होती. धान्याच्या ऐवजी व्यापाऱ्यांनी मिठाची पोती कोठारात भरून ठेवली होती.कोठाराचे काम बघणाऱ्या सरकारी नोकरांनी व्यापाऱ्यांकडून लाच घेऊन त्याकडे दुर्लक्ष केले होते. ‘या अभेद्य किल्ल्यावर शत्रू कशाला येईल, आणि ती कोठारातील पोती कशाला काढावी लागतील’ हा विचार त्यामागे होता.

परिणामी अल्लाउद्दीन खिलजीने किल्ल्याला वेढा घातल्यावर किल्ल्यात हा:हाकार माजला.अल्लाउद्दीन खिलजीने पैठणमधून अमाप लूट केली.

या एका चुकीमुळे राजा तर संपलाच, पण ज्या अतिकुशल विणकरांनी आपल्या हाताच्या जादूने देशात सोने आणले होते, ते बिचारे एका रात्रीत देशोधडीला लागले.

या इतिहासातून आपल्याला दोन अत्यंत महत्त्वाचे धडे मिळतात. पहिला म्हणजे, देशाच्या संरक्षण व्यवस्थेत कधीही आणि कोणतीही हयगय चालणार नाही. आणि दुसरा, भ्रष्टाचार हा केवळ पैशांचे नुकसान करत नाही, तर तो अख्ख्या राष्ट्राला आणि त्या राष्ट्रातील गुणी, कष्टाळू नागरिकांना भिकेला लावतो. आपल्या पूर्वजांच्या वैभवाचा अभिमान बाळगतानाच, त्यांनी केलेल्या चुकांमधून शिकणे हेच खऱ्या जागृत नागरिकाचे लक्षण आहे.

## इंधनाचा खुलेआम खेळ; नियम धुळीस, प्रशासनाचे दुर्लक्ष उघड

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : शहरात पेट्रोल व डिझेलची बाटल्यांमध्ये तसेच ड्रममध्ये सर्रास विक्री होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत असून, याकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे. शहरातील अनेक पेट्रोल पंपांवर वाहनांपेक्षा बाटल्या आणि कॅन घेऊन येणाऱ्यांचीच अधिक गर्दी दिसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, इंधनाचा टँकर पंपावर पोहोचताच काही ठराविक ग्राहकांना फोन करून या आणि ड्रम भरून घेऊन जा असा निरोप दिला जात असल्याचा गंभीर आरोपही केला जात आहे.

नियमांनुसार पेट्रोल किंवा डिझेलची खुल्या स्वरूपात साठवणूक व विक्री धोकादायक मानली जाते. तरीदेखील शहरात दिवसाढवळ्या बाटल्या, कॅन आणि मोठ्या ड्रममध्ये इंधन भरून दिले जात असल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एखाद्या ठिकाणी किरकोळ ठिणगी जरी पडली तरी मोठी दुर्घटना घडू शकते, याची जाणीव असूनही संबंधित विभाग व प्रशासन मात्र शांत असल्याचे चित्र आहे.

त्यामुळे नेमके कुणाच्या आशीर्वादाने हा प्रकार सुरू आहे? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, काही पंप चालकांकडून नियमांना हरताळ फासत मोठ्या प्रमाणात इंधन विक्री होत असल्याने सामान्य वाहनधारकांना ताटकळत उभे राहावे लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने शहरातील पेट्रोल पंपांची तपासणी करून बाटली व ड्रममधील इंधन विक्रीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

अन्यथा, भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे

## कर्तबगार महिलांचा सन्मान यावर्षी तरी होईल का?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार दरवर्षी ३१ मे रोजी दिला जातो. परंतु गेल्या दोन वर्षापासून आचारसंहितेच्या कारणास्तव शासनाने ग्रामीण महिलांना सन्मानापासून वंचित ठेवले आहे. सदर रखडलेले पुरस्कार यावर्षी तरी वितरित करावे, अशी मागणी खानदेश साहित्य संघाचे जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर यांनी केली आहे.

९ मे २०२३ शासन निर्णयानुसार महिला व बाल विकास क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत , गटपंचायत क्षेत्रातील दोन कर्तबगार महिलांना ग्रामपंचायत कार्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अर्थात ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात , सन्मानित करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला होता.

त्यानुसार ३१ मे २०२३ पासून राज्यात अनेक महिलांना सन्मानपत्र सन्मानचिन्ह शाल व श्रीफळ व प्रति महिला पाचशे रुपये रोख देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यानंतर मात्र गेल्या दोन वर्षापासून लोकसभा व विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे सदर पुरस्कार रखडले होते. आचारसंहिता संपल्यानंतर देखील शासनाला जाग आली नाही. संबंधित महिलांना पुरस्कार देण्यापासून सोईस्कर विसर पडला. खरंतर आचारसंहिता संपल्यानंतर सदर पुरस्कारांचे वितरण झाले पाहिजे होते. पण ते झाले नाही त्यामुळे महिलांवर अन्याय झाला. तसेच शासन आदेशाचा अनादर झाला.

यावर्षी तरी या कर्तबगार ग्रामीण महिलांवर अन्याय होऊ नये तसेच ग्रामपंचायत मध्ये योग्य महिलांना सन्मानित करण्यात यावे अशी मागणी आहे. महापुरुषांची जयंती पुण्यतिथी पारंपारिक पद्धतीने आपण साजरी करतो त्यामुळे ग्रामीण कर्तबगार महिलांना पुरस्कार देऊन सन्मान व्हावा अशी रास्ता अपेक्षा डी. ए धनगर यांनी व्यक्त केली आहे.





अमळनेर : श्री. रवींद्र जैन (मुन्नाशेठ) व नगरसेवक श्री. देवेंद्र कांबळे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना ग्लोबल महातेज वृत्तपत्राचे ब्युरो चीफ रजनीकांत पाटील व मंगळग्रह सेवा संस्थेचे जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी.

## शेतकी संघ निवडणुकीत उमेदवारांना चिन्हांचे

पान १ वरून : असून महायुतीचे घटक असलेले विद्यमान आमदार व खासदार आमने सामने येऊन ठेपले आहेत. त्यात काँग्रेसने आव्हानेही आव्हान उभे केले आहे. माजी आमदार शिरीषदादा चौधरी तथा शिवसेना शिंदे गटाने मात्र एकही उमेदवार दिला नसल्याने या निवडणुकीपासून हा पक्ष अलिप्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. शेतकी संघाचे जनरल मतदारसंघाचे मतदार तालुकाभर विखुरलेले असल्याने तडपत्या उन्हात प्रचारास जाताना व्यक्तिशः मतदारसंघातील उमेदवारांची कसरत होणार आहे, त्यात प्रचाराला आठच दिवस शिल्लक असल्याने मोठी धावपळ होणार आहे. शहरात देखील मतदारांची संख्या मोठी आहे. अनेक वर्षाच्या प्रतीक्षेनंतर ही निवडणूक होत असल्याने या निवडणुकीला महत्व प्राप्त झाले आहे. ३० मे रोजी मतदान व ३१ मे रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे.

## राजू भाट, जुबेर पठाण यांची नियुक्ती

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

काँग्रेस पक्षाच्या, महाराष्ट्र संघटन सृजन अभियानांतर्गत जळगाव जिल्ह्यात आलेल्या, काँग्रेस पक्ष निरीक्षकांनी, बऱ्याच जुन्या- नव्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन नियुक्त्या केलेल्या आहेत. सदरच्या नियुक्त्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने जाहीर केलेल्या आहेत. त्यात जळगाव ग्रामीण पश्चिम भागात काँग्रेस अल्पसंख्यांक ब्लॉक अध्यक्ष (तालुकाध्यक्ष) म्हणून, अमळनेर ग्रामीणसाठी राजू नथ्थू भाट व अमळनेर शहरासाठी जुबेर आयुब खान (युसुफ) पठाण यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचे तालुका अध्यक्ष बी.के सूर्यवंशी, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, मनोज पाटील, संदीप घोरपडे, धनगर अण्णा पाटील, प्रा. श्याम पवार यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिलेल्या आहेत.



राजू भाट



जुबेर खान



अमळनेर : राज्यस्तरी शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांकडून पुरस्कार स्वीकारतांना क्रीडा शिक्षक एस. पी. वाघ.

## अमळनेरच्या क्रीडा शिक्षक एस.पी.वाघ हे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानीत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर** : नुकतेच अहिल्यानगर येथे संपन्न झालेल्या छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय ६वे ग्रामीण साहित्य संमेलन व “राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा २०२६” संपन्न झाला.

या सोहळ्यात महाराष्ट्रातील कवी , लेखक , गायक , ग्रामीण साहित्यीक , पोवाडाकार , लावणी सम्राट , प्रबोधनकार अश्या क्षैत्रातील मान्यवंर उपस्थित होते. ग्रामीण संस्कृती जपण्यासाठी ग्रामीण साहित्य जपणे व संवर्धन करणे आपले कर्तव्य आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधुन महाराष्ट्र शैक्षणिक व विविध क्षैत्रात कार्य करण्यां-या शिक्षकांचा राज्यस्तरीय पुरस्काराने शाल , श्रीफळ , बुके , सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानीत करण्यात आले.

द्रौ.रा.कन्या शाळेचे पर्यवेक्षक व क्रीडा शिक्षक श्री .एस पी वाघ यांना (छ.संभाजी महाराज महाराष्ट्र गौरव पुरस्कार) ,, श्री हिरालाल रमेश बाविस्कर सर के पी सनेर माध्यमिक विदयालय जैतपीर येथील क्रीडाशिक्षक ( राज्यस्तरीय गुणवंत क्रीडा शिक्षक पुरस्कार ) , श्री गोकुळ विक्रम बोरसे स्व. सौ.पद्मावती नारायणदास मुंदडा हायकुलचे क्रीडा शिक्षक यांना ( गुणवंत क्रीडा शिक्षक पुरस्कार ) देऊन मान्यवरांच्या शुभ हस्ते सन्मानीत करण्यात आले.

पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वाकडुन अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## प्री–वेडिंग शूटनंतर भावी वधूचा मृत्यू

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : लग्न जुळल्यानंतर दोघेही संसाराची स्वप्ने रंगवू लागले. मात्र, प्री-वेडिंग केल्यानंतर आजारी पडलेल्या युवतीचा आठ दिवसांनी उपचारादरम्यान मृत्यू झाला. ३ मे रोजी लग्न सोहळा होता. वाशीम जिल्ह्यातील एका गावात ही दुर्दैवी घटना घडली.

**नेमके काय घडले? :** मेहकर तालुक्यातील डोणगावपासून जवळच असलेल्या एका गावातील तरुण आणि वाशीम जिल्ह्यातील एका गावामधील तरुणीचे लग्न जुळले. ३ मेच्या मुहूर्तावर लग्न ठरले. लग्नासाठी सोन्या-चांदीचे दागिने, कपडे खरेदीला जाण्यासाठी उपवर मुलाने नवीन चारचाकी गाडी खरेदी केली. मोठ्या थाटामाटात लग्नाची खरेदी केली गेली. तर दुसरीकडे विवाह सोहळा अविस्मरणीय व्हावा, यासाठी प्री-वेडिंग शूट करण्याचे ठरले. नवऱ्या मुलाचा कृषी केंद्राचा व्यवसाय असल्याने प्री-वेडिंगसुद्धा कृषीशी निगडितच असावे, याचे नियोजन करण्यात आले.

**१६ एप्रिलला झालेले शूट :** भावी वधू-वराने शेतकरी म्हणून प्री-वेडिंग शूट करायचे ठरविले. डोणगावपासूनच जवळच असलेल्या एका निसर्गरम्य व जंगल परिसरात १६ एप्रिलला ४३ अंश सेल्सिअस तापमानात शूट झाले. त्याच दिवशी घरी परतल्यानंतर मुलगी आजारी पडली. सुरूवातीला गावातच उपचार करण्यात आले. नंतर शिरपूर, वाशीम, अकोला येथे औषधोपचार करूनही प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने अखेर छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले. २३ एप्रिल २०२६ रोजी उपचारादरम्यान मुलीचा मृत्यू झाला.

**मृत्यू नक्की कशामुळे? :** अलीकडे तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. एसी गाडीमधील गारवा व पुन्हा प्री-वेंडिंग शूटसाठी ४३ अंशांवर तापमान असताना बाहेर जाणे, यामुळे उन्हाचा फटका बसून ती दगावल्याची शक्यता वर्तविली जात आहे. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## अमळनेर नगरपरिषद, अमळनेर जि. जळगाव

**अमळनेर नगरपरिषद कार्यालय, बांधकाम विभाग**
**जाहीर सूचना ए. एम. सी. पी. एन. नं.०६ / २०२६-२०२७**
**दिनांक:-२१/०५/२०२६**

### जाहीर सूचना

**(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये)**

अमळनेर शहरातील तमाम जिर्ण व पडावू इमारतधारकांना सुचित करण्यात येते की, धोकादायक इमारती व जीर्ण झालेल्या मोडकळीस आलेल्या इमारती संदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका सुरू आहे, धोकादायक इमारतींच्या अनुषंगाने कायदयातील तरतुदी शासन परिपत्रक दि. ५/११/२०१५ नुसार कारवाई करण्याचे अधिकार नगरपरिषदेस प्राप्त आहेत.

शहरात जीर्ण व मोडकळीस आलेल्या घरांची, इमारतींची संख्या बरीच असून त्यांची पडझड होण्याची दाट शक्यता असते. सबब सन २०२६-२०२७ या वर्षातील पावसाळ्या पूर्वी आपल्या जीर्ण व मोडकळीस आलेली घरे / इमारती स्वतःहून काढून घ्याव्यात व आवश्यकता असल्यास दुरुस्त करण्यासंबंधी कार्यवाही स्वतः करून संभाव्य अपघात टाळावा. पडावू झालेल्या घरांचा / इमारतींचा पडावू भाग पडल्यास व त्यापासून काही जीवित अगर वित्तहानी झाल्यास त्यास नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी घर मालक व भाडेकरू यांचीच राहील. त्याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच अमळनेर शहरातील बोरी नदीकाठी / नाल्याकाठी राहणाऱ्या नागरिकांना सूचित करण्यात येते की, पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे किंवा सततधार पावसाळयामुळे नदी नाल्याला पूर येण्याचा संभव असतो. तरी सन २०२६-२०२७ या वर्षातील पावसाळ्यापूर्वी नदी / नाल्याकाठावरील आपली घरे / इमारती स्वखर्चाने इतरत्र हलविण्याची व्यवस्था करावी. पावसामुळे नदी नाल्याना पूर येऊन नदीकाठावरील घरात / झोपडीत / इमारत कोसळून त्यात पाणी शिरून प्राणहानी अगर वित्तहानी झाल्यास नगरपरिषद व शासन कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
**(गणेश शिंदे)**
**मुख्याधिकारी, अमळनेर नगरपरिषद**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# आजारांपासून दूर राहण्यासाठी बदला या ‘५’ सवयी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सध्याच्या आधुनिक राहणीमानात आपण नकळतपणे अनेक आजारांना निमंत्रण देत आहोत. केवळ खाण्यापिण्यामुळेच नाही, तर आपण वापरत असलेले प्लास्टिक, नायलॉनचे कपडे आणि रबराच्या चपला सुद्धा आपल्या आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहेत, असे अनेक वर्षांच्या वैद्यकीय निरीक्षणातून समोर आले आहे.

## विकारांना आमंत्रण

साधे राहणे हल्ली कुणाला फारसे आवडत नाही. पण एक मात्र नक्की लक्षात घ्यायला हवं की, साधं राहणीमान तुम्हाला विकारांपासून दूर ठेवण्याचे काम करते. अलीकडे आपल्याला होणाऱ्या अनेक विकारांचे मूळ आपल्या राहाणीमानात दडलेले आहे, असे मला माझ्याकडे गेली अनेक वर्षे येणाऱ्या रुग्णांच्या पाहणीतून लक्षात आले आहे.

## प्लास्टिक आणि रबराचा वापर

आधुनिक राहणीचे आक्रमण, आजकाल केवळ शहरांपुरते सीमित राहिलेले नाही. लहानसहान गावांपर्यंत टेरिलिन, नायलॉन कपडे पोचलेले आहेत. कापसाचे सुताचे कपडे केव्हाच नाहीसे झाले आहेत. पादत्राणे प्लस्टिक व रबर यांचीच वापरावी लागतात. भरपूर पैसे द्यायचे ठरविले तरी चामड्याची पादत्राणे सर्वत्र मिळत नाहीत.

कपड्यांपासून सपाता किंवा चपलांपर्यंत सारे काही बदलले आहे. खूप कृत्रिम गोष्टी वापरात आल्या आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्लास्टिक आणि या सर्व कृत्रिम गोष्टी विकार घेऊन येताना दिसताहेत. म्हणून आजचा हा भाग त्यासंबंधितच.

## कपडे, जोडे आणि विकार

सगळ्यांच रोगांना ‘खाणे-पिणे’ कारणीभूत असते असे नाही. वेडेवाकडे, अतिरेकी कुपथ्यकारक किंवा कमी खाऊन, कदन्न खाऊन, अवेळी खाऊन अनेक पोटाचे व तत्सम विकार होतात, बळावतात आणि दुसऱ्या असाध्य रोगांना जन्म देतात. पण आपल्या नकळत आपले कपडे, अंथरूण-पांघरूण, चपला जोडेही अनेक रोगांना आमंत्रण देत असतात.

## टेरिलिन रोग निर्माण करते

सर्वच प्लास्टिक, रबर, टेरिलिन रोग निर्माण करते असे नाही. पण सुबकता, तलमपणा, नाना आकर्षक रंग, डिझाईनमधील नवलाई व मुख्य म्हणजे या पदार्थांची सेकंड किंवा वापरून वापरून पुनःपुन्हा भट्ट्या लावून तयार केलेल्या प्लास्टिक व रबर यांच्याबरोबर वापरलेली केमिकल्स अनेक रोगांना जन्म देतात. टेरिलिनच्या कपड्यांची अनेकांना ॲलर्जी असते. या कपड्यांमुळे शरीरांतून घामावाटे बाहेर पडणारी मलद्रव्ये बाहेर पडत नाहीत. घाम शरीरात साठून राहतो.



## चरबी शरीरात साठते

विशेषतः स्थूल, मधुमेही, रक्तदाब वाढलेले व हृद्रोगी रुग्णांनी टेरिलिन, टेरिकॉट, नायलॉन असे कृत्रिम धाग्याचे कडपे वापरू नयेत. ही मलद्रव्ये त्वचेत साठतात. ज्या वयात हे रोग झालेले असतात, त्या वयात मूत्रंद्रियांच्या मार्फत मलद्रव्यांचे उत्सर्जन नीट होत नाही. वय साठ-पासष्टच्या पुढे मूत्रेंद्रिय दुर्बल होते. घामावाटे मलद्रव्याच्या बाहेर पडण्याचा रस्ता बंद झाला की फाजील चरबी शरीरात साठते. मग रक्तशर्करा, रक्तातील चरबी, युरिक ॲसिड इत्यादी मळ वाढतात. वर सांगितलेल्या विकारांबरोबर त्वचाविकार सुरू होतात.

## त्वचाविकारांना आमंत्रण

असे कपडे घालून किंवा प्लास्टिक व रबराच्या चपला घातल्यामुळे त्वचेचे विकार झालेले अनेकानेक रुग्ण गेली चाळीस- पंचेचाळीस वर्षे माझ्याकडे येत आहेत. त्यांच्या व त्यांची यापूर्वी तपासणी केलेल्या वैद्यकीय चिकित्सकांच्या बहुधा ही गोष्ट लक्षात येत नाही असे चौकशी केल्यावर लक्षात आले. कॉटनचे कपडे, चामड्याच्या किंवा कापडाच्या सपाता, कापडी मोजे घालावयास सांगितले की, त्वचारोगांना उतार पडतो असे पाहिले आहे. मानेवरचा चट्टा, नायटा, अंगावर उठणारे काळे-पांढरे डाग, त्वचेची विवर्णता, काखेत-जांघेत, विलक्षण खाज सुटणे, दीर्घकाळ त्रास देणारा नायटा बळावणे, पावलावर चप्पल लागून होणारे इसब, या विकारांना बऱ्याच वेळा वरील कृत्रिम आवरणे-प्रावरणे, कपडे, चपला-बूट कारणीभूत असतात.

## कॉटन वापरा

काही स्त्रियांना आकर्षक व घट्ट बॉडीज घातल्यामुळे स्तनांना फोड, पुरळ, पुटकळ्या झालेल्या आढळतात. काट्याचा नायटा होतो. डायरेक्ट त्वचेशी संबंध येत असलेल्या चड्ड्या, लंगोट, बॉडीज, अंडरवेअर, पोहण्याच्या चड्या, पायमोजे हे सर्व कॉटनचेच असावे. ज्यांना त्वचाविकार, वृक्कविकार, हृद्रोग, मधुमेह, स्थौल्य, कंड, आग, सूज हे विकार बळावू द्यायचे नाहीत त्यांनी कृत्रिम प्रावरणे वापरू नयेत. त्यांनी कॉटनच वापरावे. काहींना अशी कॉटनची महागडी चैन परवडत नाही. त्यांनी काय करावे? कॉटन व टेरिलिन असे दोन्ही धागे असलेले कापडाचे कपडे शिवावेत. टेरिलिनचा कपडा कधीच फाटत नाही, पण त्याचबरोबर त्यामुळे उत्पन्न झालेले त्वचा, घाम, लघवीसंबंधी रोग कायमचे घर करून राहतात.

## प्लास्टिक आणि आतड्यांचे विकार

कपड्याच्या किमतीच्या अनेकपट पैसा औषधाकरिता खर्च होऊनही रोग तसेच राहतात. अशीच गोष्ट प्लास्टिक किंवा पॉलिथिलिन पिशव्यांमधील खाद्यपदार्थांची आहे. या पिशव्या दिसायला आकर्षक, वजनाला हलक्या, हाताळायला सोप्या आहेत. पण या पिशव्यांत नेहमीकरिता खाद्यपदार्थ ठेवणे म्हणजे आतड्याचे विकार विकत घेणे आहे.

## कृत्रिम रंग टाळा


फळे, भाजी, कोरडे पदार्थ यांच्याकरिता तात्पुरते पॅकिंग म्हणून वापरणे थोडे क्षम्य आहे, पण नेहमीकरिता या पॉलिथिलिन बॅगच्या वापरांनी पेट्रोलियमधारक द्रव्य आतड्यांना वण निर्माण करू शकतात. अलीकडे अनेक खाद्यपदार्थांत जेलीयुक्त कृत्रिम रंग वापरण्याची फॅशन आहे. मिठाईला लावलेला वर्ख आकर्षक दिसत असला तरी तो पॉयझन आहे. मिठाई बनविताना टाकलेले लाल, गुलाबी, हिरवे, पिवळे, केशरी इत्यादी रंग म्हणजे लहान मुले व म्हाताऱ्यांच्या पोटाची वाट लावण्याचा पक्का मार्ग होय, या रंगांवर बहिष्कार हवा.

# विमानाचे पंख पातळ असूनही त्यात हजारो लिटर इंधन कसे समावते ?

## हवेतील हवेचा दाब आणि इंधनाचे वजन यांचा कसा साधला जातो ताळमेळ ?



ग्लोबल महातेज वृत्तसेवा



आपण सर्वांनीच आकाशात किंवा विमानतळावर अजस्र विमाने उडताना पाहिली आहेत. विमान आकाराने किती मोठे आणि जड असते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. पण, कधी तुम्ही विमानांच्या पंखांकडे बारकाईने पाहिले आहे का? विमानाचे पंख अतिशय पातळ दिसतात. त्यामुळे ‘इतके पातळ पंख एवढ्या मोठ्या विमानाचे वजन हवेत कसे पेलत असतील?’ असा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. पण, याहूनही रंजक आणि आश्चर्यकारक बाब म्हणजे, याच पातळ पंखांच्या आत विमानाचे हजारो लिटर तेल (इंधन/फ्यूल) साठवलेले असते. वरून सपाट आणि एखाद्या पत्र्यासारखे दिसणारे हे पंख एवढे वजन कसे काय झेलतात आणि त्यांच्यात इंधन कसे ठेवले जाते? यामागील रंजक गुपिते जाणून घ्या.

आपल्याला बाहेरून विमानाचे पंख अगदी सपाट आणि ठोस वाटतात; पण हा केवळ आपल्या डोळ्यांचा भम आहे! प्रत्यक्षात हे पंख आतून पूर्णपणे पोकळ असतात, जणू काही एखादी मोठी रिकामी बाटली किंवा मोठा डबा. विमान बनवणारे अभियंते (इंजिनिअर्स) अत्यंत हुशार पद्धतीने याची रचना करतात. हे पंख विमानाला हवेत वर उचलण्याचे (लिफ्ट देण्याचे) काम तर करतातच; पण त्याचसोबत इंधन साठवण्यासाठी एक उत्तम ‘टँक’ (टाकी) म्हणूनही काम करतात. पंखांच्या आत अतिशय मजबूत आणि खास धातूचे सांगाडे असतात, जे त्यांना प्रचंड ताकद देतात. हे आपण पुढील तीन भागांच्या मदतीने समजू शकतो.

**स्पार :** पंखांच्या आत विमानाला समांतर जाणाऱ्या दोन ते तीन लांब आणि अत्यंत मजबूत सळ्या असतात, ज्यांना ‘स्पार’ म्हणतात. हे विमानाचे कणा म्हणून काम करतात. विमानाला खरी ताकद याच भागामुळे मिळते आणि संपूर्ण विमानाचे वजन पेलण्यास हे मदत करतात.

**रिब :** या मुख्य सळ्यांच्या (स्पार्सच्या) दरम्यान छोट्या-छोट्या बरगड्यांसारखी रचना असते, ज्यांना ‘रिब’ म्हणतात. हे पंखांना योग्य आकार देतात आणि त्यांना अधिक मजबूत बनवतात.

**स्किन :** पंखांच्या बाहेरील बाजूस असलेल्या धातूच्या पातळ थराला ‘स्किन’ म्हटले जाते.

हे सर्व भाग एकत्र येऊन विमानाला एक मजबूत आणि आतून पोकळ रचना देतात. पंखांच्या आत ‘स्पार’ आणि ‘रिब’ यांच्यामध्ये जी रिकामी जागा उरते, तिचे रूपांतर छोट्या-छोट्या कप्प्यांमध्ये (कंपार्टमेंटस्) केले जाते. हे कप्पे पूर्णपणे ‘सील’ म्हणजेच हवाबंद असतात, जेणेकरून इंधन अजिबात गळणार नाही. विशेष म्हणजे, पंखांच्या आत वेगळी प्लास्टिक किंवा धातूची टाकी ठेवलेली नसते, तर पंखांचा स्वतःचा पोकळ सांगाडाच इंधनाची टाकी म्हणून वापरला जातो. जसे आपल्या घराच्या छतावर पाण्याची टाकी असते, अगदी तसेच विमानाचे पंख त्याच्या इंधनासाठी मुख्य टाकीचे काम करतात.

# दररोज जेवणाबरोबर एक पापड खाऊन तर बघा!

## पापड खाण्याचे ‘हे’ फायदे तुम्हाला माहीतच नाहीत

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

एकेकाळी एप्रिल-मे महिन्यांमध्ये प्रत्येक भारतीय घरात पापड बनविण्याची घाई असायची. मात्र, आता बदलत्या जीवनशैलीमुळे घरी पापड बनविण्याची कला लुप्त होत चालली आहे. हल्ली आपण सगळेच थेट दुकानातून पापड आणतो. आपल्या देशातील कित्येक भागांत दररोज न चुकता, शाकाहारी पदार्थांसोबत पापड खाण्याची परंपरा पूर्वापार चालत आली आहे. भारतातील प्रत्येक प्रदेशाची स्वतःची विविधता आहे- दक्षिण भारतीया तांदळाचे पापड, राजस्थानचे खिचिया पापड किंवा पंजाबी उडीद डाळीचे पापड. म्हणजे लोणचे आणि पापड हे आपण साईड डिश म्हणून खातो. त्यामुळे जेवणाची मजा दुप्पट होते. पण, फक्त चवीसाठी खाल्ले जाणारे हे पापड आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

भारतीय खाद्यसंस्कृतीत लोणची, चटण्या, रायता आणि पापड हे मुख्य जेवणासोबत दिले जातात. ते केवळ जेवणाची चव वाढवण्यासाठीच दिले जात नाहीत, तर त्यांचा संबंध आपल्या आरोग्याशीही आहे. दही आणि लोणचे आतड्यातील निरोगी जीवाणू वाढवण्यास मदत करतात; तर चटणी पोटाला थंडावा देते आणि पापड पचनसंस्था निरोगी ठेवतात. जेवणासोबत पापड खाण्याची परंपरा खूप जुनी आहे. पापड खाण्याचे इतर कोणते आरोग्यदायी फायदे आहेत आणि ते योग्य प्रकारे कसे खावेत, याबद्दलची माहिती आपण जाणून घेऊ.

### पापड कसा बनवला जातो?

पापड सहसा मूग आणि उडीद डाळीपासून बनवला जातो. या डाळी रात्रभर पाण्यात भिजवून, नंतर त्यांची बारीक पूड केली जाते. ओवा, हिंग, काळी मिरी पूड व पापडखार हे चार घटक बहुतेक पापडांमध्ये आढळतात, जे केवळ चवच नाही, तर त्याचे फायदेही वाढवतात.

### पापडाचे फायदे

- ओवा, काळी मिरी, हिंग, पापडखार हे पापडात वापरले जाणारे घटक पचनक्रिया सुलभ करण्यास मदत करतात आणि गॅस, आम्लपित्त व पोटफुगी यांसारख्या समस्यांनाही दूर ठेवतात.

- पापड हा एक आरोग्यदायी नाश्ता आहे. जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करीत असाल, तर तुम्ही त्याचा तुमच्या आहारात समावेश करू शकता. त्यामुळे पोट भरते आणि उष्मांक वाढत नाहीत.

- जर तुम्हाला मळमळण्याचा त्रास होत असेल, तर पापड खाल्ल्याने या त्रासापासून बऱ्याच अंशी आराम मिळतो.

### पापड खाण्याची योग्य पद्धत

आपण पापडाचे आरोग्यदायी फायदे जाणून घेतले आहेत. पण हे फायदे मिळविण्यासाठी तो योग्य प्रकारे खाणे महत्त्वाचे आहे. जर कधीतरी पापड खात असाल, तर तो तळायला काही हरकत नाही; पण जर तुम्ही तो वारंवार खात असाल, तर तो भाजून खाणे उत्तम ठरेल.

# ‘आयएफएस’मध्ये बसवराज केंपवाडे देशात प्रथम



ग्लोबल महातेज वृत्तसेवा




बेळगाव जिल्ह्यातील अथणी तालुक्यातील सवदी गावचा सुपूत्र आणि शेतकरी कुटुंबातील बसवराज केंपवाडे याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) ‘भारतीय वन सेवा’ (आयएफएस-२०२५) परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून गाव, तालुका आणि राज्याची कीर्ती राष्ट्रीय स्तरावर उंचावली आहे.

सामान्य शेतकरी कुटुंबातील बसवराजने केवळ दुसऱ्याच प्रयत्नात अथक परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्याच्या या अतुलनीय यशामुळे सवदी गावासह संपूर्ण परिसरात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. बसवराजने प्राथमिक शिक्षण सवदी येथे पूर्ण केले. त्यानंतर अथणी येथे पुढील शिक्षण घेत शिरसी येथील महाविद्यालयातून पदवी शिक्षण पूर्ण केले. पुढे बंगळूर येथे राहून त्याने यूपीएससी परीक्षेची कसून तयारी करीत यश संपादन केले.

बसवराजचे वडील दऱ्याप्पा केंपवाडे आणि संपूर्ण कुटुंब आपल्या सुपुत्राच्या यशामुळे आनंदित झाले आहे. गावकरीही बसवराजच्या स्वागतासाठी आतुर झाले आहेत. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही यशाचे सर्वोच्च शिखर गाठू शकतात, हे बसवराजने आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे. त्याच्या या यशाबद्दल परिसरातून कौतुक होत आहे.









# शनिदेव : राम आणि हनुमानाच्या भक्तांना विशेष आशीर्वाद का देतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमान सर्वशक्तिमान आहे. भूत, आत्मा, ग्रह, तारे आणि इतर सर्व काही त्याच्या नियंत्रणाखाली आहे. एकदा, हनुमान श्रीरामासाठी काही कामात व्यस्त होते. शनिदेव त्या ठिकाणाहून जात असताना त्यांना वाटेत हनुमानजी दिसले. आपल्या स्वभावामुळे, शनिदेवाच्या मनात खोडसाळपणा आला आणि रामाच्या कामात अडथळा आणण्यासाठी ते हनुमानजींकडे गेले. हनुमानजींनी त्यांना ताकीद देऊन थांबवले, पण शनिदेवाने नकार दिला. मग हनुमानजींनी शनिदेवाला आपल्या शेपटीने पकडले आणि रामाचे काम पुन्हा सुरू केले. कामादरम्यान, तो स्वतःच्या इतर कामांमध्ये व्यस्त होता. या काळात, शनिदेवाला अनेक जखमा झाल्या. शनिदेवाने खूप प्रयत्न केले पण तो बालाजीच्या




कैदेतून स्वतःला सोडवू शकला नाही. त्याने हनुमानाकडे विनवणी केली, पण हनुमानजी आपल्या कामात मग्न होते.

जेव्हा रामाचे काम संपले, तेव्हा त्यांना शनिदेवजींची आठवण झाली आणि त्यांनी त्यांना मुक्त केले. शनिदेवाला आपली चूक लक्षात आली आणि त्याने हनुमानाची माफी मागितली, तसेच राम आणि हनुमानाच्या कार्यात कधीही हस्तक्षेप न करण्याचे वचन दिले. त्यांनी वचन दिले की राम आणि हनुमानाच्या भक्तांना त्यांचे विशेष आशीर्वाद मिळतील.

शनिदेवाने आपल्या जखमांवर लावण्यासाठी आणि त्या लवकर बऱ्या होण्यासाठी भगवान हनुमानाकडे थोडे मोहरीचे तेल मागितले. हनुमानाने तेल दिले आणि शनिदेवाच्या जखमा बऱ्या झाल्या. त्यानंतर शनिदेवाने घोषित केले की, जो कोणी भक्त या घटनेच्या स्मरणार्थ शनिवारी त्याला मोहरीचे तेल अर्पण करेल, त्यांना त्यांचे विशेष आशीर्वाद मिळतील.

एका आख्यायिकेनुसार, लंकेचा गर्विष्ठ राजा रावणाने शनिदेवाला कैद करून लंकेत ठेवले. हनुमानाच्या आगमनापर्यंत शनिदेव तेथेच कैदेत होते. जेव्हा हनुमान सीता मातेच्या शोधात लंकेत आले, तेव्हा त्यांना माता जानकीला शोधत असलेले भगवान शनिदेव तेथे कैदेत आढळले. तेव्हा हनुमानाने शनिदेवाला मुक्त केले. स्वातंत्र्यानंतर, त्यांनी हनुमानजींचे आभार मानले आणि आपल्या भक्तांवर विशेष आशीर्वादांचा वर्षाव करण्याचे वचन दिले.

हनुमानजींचा भक्त अद्वितीय असतो. शनिदेवाला समर्पित अनेक प्रसिद्ध मंदिरे आहेत. त्यापैकी, मध्य प्रदेशातील ग्वाल्हेरजवळच्या आंटी गावातील शनिदेव मंदिर खूप विशेष मानले जाते. असे मानले जाते की हनुमानजींनी शनिदेवाला उचलून येथे फेकले. त्रेता युगापासून शनिदेवाची मूर्ती येथे आहे. हा परिसर शनिक्षेत्र म्हणून ओळखला जातो. न्यायासाठी प्रार्थना करण्याकरिता दूरदूरहून भक्त शनिवारी येथे येतात. असे मानले जाते की शनिदेवाची मूर्ती या मंदिरात कोणीही ठेवली नाही, तर ती आकाशातून पडलेल्या उल्कापिंडापासून बनवली गेली होती. खगोलशास्त्रज्ञ आणि ज्योतिषी मानतात की निर्जन जंगलात असल्यामुळे या मंदिराला एक विशेष प्रभाव आहे. नंतर, या उल्कापिंडाभोवती एक मंदिर बांधले गेले. हे शनि मंदिर विक्रमादित्याने बांधले होते. नंतर, अनेक राज्यकर्त्यांनी त्याचा जीर्णोद्धार केला.असेही म्हटले जाते की, लंकेतून निघताना भगवान शनिदेवाने तिरकस नजरेने याकडे पाहिले. त्यामुळे रावण आणि त्याच्या संपूर्ण कुळाचा नाश झाला. जेव्हा भगवान शनिदेव येथे आले, तेव्हा त्यांचा प्रभाव एखाद्या उल्कापातासारखा होता. त्या घटनेच्या खुणा आजही कायम आहेत.

## महाभारतः श्रीकृष्ण ने धृतराष्ट्र से कैसे बचाया भीम को



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

*अभी अधिक मास चल रहा है, इस महीने में भगवान विष्णु और श्रीकृष्ण की कथाएं पढ़ने-सुनने की परंपरा है। यहां जानिए श्रीकृष्ण का एक ऐसा प्रसंग, जिसमें उन्होंने भीम को धृतराष्ट्र से बचाया था, वर्ना भीम की मृत्यु हो सकती थी। जानिए प्रसंग...*

*महाभारत में युद्ध के अंतिम चरण में भीम और दुर्योधन के बीच गदा युद्ध हुआ। माता गांधारी की दिव्य शक्ति की वजह से दुर्योधन का ऊपर का शरीर वज्र की तरह कठोर बन गया था, लेकिन कमर के नीचे का हिस्सा सामान्य ही था। गदा युद्ध का ये नियम था कि योद्धा एक-दूसरे पर कमर के नीचे वाले हिस्से पर प्रहार नहीं कर सकते थे, लेकिन भीम ने दुर्योधन की जांघ पर गदा से प्रहार किया, जिससे वह गंभीर घायल हो गया और फिर उसकी मृत्यु हो गई।*

*दुर्योधन वध के बाद सभी पांडव श्रीकृष्ण के साथ धृतराष्ट्र से मिलने पहुंचे थे। धृतराष्ट्र अंधे थे, लेकिन वे बहुत शक्तिशाली थे। ऐसा माना जाता है कि धृतराष्ट्र में कई हाथियों के समान बल था यानी वे भीम से भी ज्यादा बलवान थे। एक बार उनकी पकड़ में कोई आ जाए, तो उसे वे जीवित नहीं छोड़ते थे। दुर्योधन की मृत्यु से धृतराष्ट्र इतने दुखी और गुस्से में थे कि वे भीम को डालना चाहते थे। श्रीकृष्ण के साथ युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल और सहदेव धृतराष्ट्र के सामने पहुंचे, तो सभी एक-एक करके धृतराष्ट्र को प्रणाम कर रहे थे और धृतराष्ट्र सभी को गले लगा रहे थे। श्रीकृष्ण धृतराष्ट्र के मन की बात पहले से ही समझ गए थे कि वे भीम को मारना चाहते हैं। जब धृतराष्ट्र ने भीम को गले लगाने की इच्छा जताई तो श्रीकृष्ण ने तुरंत ही भीम के स्थान पर भीम के आकार की एक लोहे की मूर्ति आगे बढ़ा दी।*

*धृतराष्ट्र ने गुस्से में उस लोहे से बनी मूर्ति को दोनों हाथों से ऐसा दबोचा कि मूर्ति के टुकड़े-टुकड़े हो गए। मूर्ति तोड़ने की वजह से उनके मुंह से भी खून निकलने लगा और वे जमीन पर गिर गए। कुछ ही देर बाद जब उनका क्रोध शांत हुआ तो उन्हें लगा कि भीम मर गया है, इससे दुखी होकर वे रोने लगे। धृतराष्ट्र को अपने किए पर पछतावा हो रहा था। तब श्रीकृष्ण ने कहा कि महाराज भीम अभी जीवित है, आपने जिसे तोड़ा है, वह तो भीम के आकार की एक मूर्ति थी। इस प्रकार श्रीकृष्ण ने भीम के प्राण बचा लिए। युद्ध के बाद युधिष्ठिर राजा बने। इसके बाद धृतराष्ट्र और गांधारी भी पांडवों के साथ ही रहने लगे। कुंती इन दोनों का ध्यान रखती थीं, लेकिन भीम धृतराष्ट्र ताने मारते रहते थे। करीब 15 सालों तक ऐसे ही चलता रहा। एक दिन धृतराष्ट्र और गांधारी ने वानप्रस्थ यानी वन में तप करने का निश्चय किया और महल से वन की ओर चल गए। कुंती ने भी इन दोनों के साथ चली गईं। इन तीनों के वन में जाने के करीब 3 साल बाद देवर्षि नारद युधिष्ठिर के पास पहुंचे। नारद मुनि ने युधिष्ठिर को बताया कि धृतराष्ट्र, गांधारी और कुंती हरिद्वार में रहकर तपस्या कर रहे थे, उस समय एक दिन वन में आग लग गई। दुर्बलता के कारण धृतराष्ट्र, गांधारी, कुंती आग से बचने के लिए भाग नहीं सके और उस आग की वजह से तीनों की मृत्यु हो गई। ये समाचार सुनने के बाद पांडवों ने विधिपूर्वक तीनों का श्राद्ध कर्म करवाया।*

# मंदिरात जाण्यापूर्वी घंटा का वाजवतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंदिराच्या दारात आणि विशेष ठिकाणी घंटी किंवा घंटा लावण्याची प्रथा प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. पण ही घंटा किंवा घंटी लावण्यामागे धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व काय आहे? तुम्ही कधी विचार केला आहे का की ती कोणत्या कारणासाठी लावली जाते?

**घंटा ४ प्रकारच्या असतात**

१. गरुड घंटी : गरुड घंटी लहान असते जी एका हाताने वाजवता येते.

२. द्वार घंटी : ही दारावर टांगलेली असते. ही मोठ्या आणि लहान दोन्ही आकाराची असते.

३. हात घंटी : पितळेची ठोस एक गोल ताटलीसारखी असते जी लाकडाच्या गद्याने ठोकून वाजवतात.

४. घंटा : ही खूप मोठी असते. कमीत कमी ५ फूट लांब आणि रुंद. ही वाजवल्यानंतर आवाज अनेक किलोमीटरपर्यंत जातो.

मंदिरात घंटी लावण्यामागे केवळ धार्मिक कारणच नाही तर वैज्ञानिक कारणही त्यांच्या आवाजाला आधार देतात. वैज्ञानिकांचे म्हणणे आहे की जेव्हा घंटी वाजवली जाते तेव्हा वातावरणात कंपन निर्माण होते, जे वायुमंडळामुळे खूप दूरपर्यंत जाते.

या कंपनाचा फायदा असा आहे की त्याच्या क्षेत्रात येणारे सर्व जीवाणू, विषाणू आणि सूक्ष्म जीव नष्ट होतात ज्यामुळे आजूबाजूचे वातावरण शुद्ध होते.

म्हणून ज्या ठिकाणी घंटी वाजण्याचा आवाज नियमित येतो तेथील वातावरण नेहमी शुद्ध आणि पवित्र राहते. यामुळे नकारात्मक शक्ती दूर होतात. नकारात्मकता दूर झाल्याने समृद्धीचे दरवाजे उघडतात.



पहिले कारण घंटी वाजवल्याने देवांसमोर तुमची हजेरी लागते. मान्यतेनुसार घंटी वाजवल्याने मंदिरात स्थापित देवी-देवतांच्या मूर्तींमध्ये चेतना जागृत होते, ज्यानंतर त्यांची पूजा आणि आराधना अधिक फलदायी आणि प्रभावशाली बनते.

दुसरे कारण असे की घंटीचा मनमोहक व कर्णप्रिय ध्वनी मन-मस्तिष्काला अध्यात्म भावाकडे नेण्याचे सामर्थ्य ठेवतो. मन घंटीच्या लयीशी जुळून शांतीचा अनुभव घेते. मंदिरात घंटी वाजवल्याने मनुष्याची अनेक जन्मांची पापेसुद्धा नष्ट होतात. सकाळी आणि संध्याकाळी जेव्हा मंदिरात पूजा किंवा आरती होते तेव्हा एक लय आणि विशेष धूनने घंट्या वाजवल्या जातात, ज्यामुळे तेथे उपस्थित लोकांना शांती आणि दैवी उपस्थितीची अनुभूती होते.

तिसरे कारण असे की जेव्हा सृष्टीचा प्रारंभ झाला, तेव्हा जो नाद (आवाज) घुमला होता तोच आवाज घंटी वाजवल्यावरही येतो. घंटी त्याच नादाचे प्रतीक आहे.

### घंटा वाजवण्याचे आरोग्य लाभ

१. मंदिराच्या घंट्या कॅडमियम, झिंक, निकेल, क्रोमियम आणि मॅग्नेशियमपासून बनतात. त्याचा आवाज मेंदूचा उजवा आणि डावा भाग संतुलित करतो. जसे तुम्ही घंटी किंवा घंटा वाजवता, त्यातून एक तीव्र आवाज निर्माण होतो. हा आवाज १० सेकंदांपर्यंत घुमतो.
२. या घुमण्याचा कालावधी शरीरातील सर्व ७ हीलिंग सेंटर्स सक्रिय करण्यासाठी खूप चांगला असतो. यामुळे एकाग्रता वाढते, मनही शांत राहते.
३. घंटीचा ध्वनी मन, मेंदू आणि शरीराला ऊर्जा व शक्ती प्रदान करतो आणि मनुष्य सकारात्मक ऊर्जेने वेढलेला राहतो.
उल्लेखनीय आहे की हाच नाद 'ओंकार'च्या उच्चारानेही जागृत होतो. काही ठिकाणी असेही लिहिले आहे की जेव्हा प्रलय येईल तेव्हा सुद्धा असाच नाद घुमेल. मंदिराबाहेर लावलेल्या घंटीला किंवा घंटेला काळाचे प्रतीकही मानले गेले आहे.

# शनिवारी हनुमानजींची पूजा करण्याचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शनिवार हा दिवस प्रामुख्याने न्यायाची देवता असलेल्या शनिदेवांना समर्पित आहे. तथापि, या दिवशी भगवान हनुमानाची पूजा करण्यालाही विशेष महत्त्व आहे.

**शनिदेव आणि हनुमान यांच्यातील संबंध :** पौराणिक कथेनुसार, रावणाने शनिदेवांना कैद केले होते आणि भगवान हनुमानानेच त्यांची रावणाच्या कैदेतून सुटका केली होती.प्रसन्न होऊन, शनिदेवांनी हनुमानाला वचन दिले की जो कोणी भक्त शनिवारी हनुमानाची पूजा करेल, त्याला शनीची साडेसाती, धैय्या किंवा इतर कोणत्याही शनिदोषाचा त्रास होणार नाही.

संकटमोचक : हनुमानाला 'संकटमोचक' (संकट दूर करणारा) म्हणून ओळखले जाते. त्यामुळे, शनिवारी त्यांची पूजा केल्याने जीवनातील सर्व संकटे, दुःखे आणि नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि मानसिक व शारीरिक शक्ती प्राप्त होते.

**शनि दोषापासून मुक्ती :** असे मानले जाते की शनिवारी भगवान हनुमानाची पूजा, उपवास आणि प्रार्थना केल्याने शनिदेव लवकर प्रसन्न होतात आणि भक्तांचे त्यांच्या क्रोधापासून रक्षण होते.

**शनिवारी भगवान हनुमानाची पूजा करण्याचे प्रमुख उपाय**

**पठण:**

१. हनुमान चालिसेचे पठण करणे.
२. सुंदरकांडाचे पठण करणे विशेष फलदायी मानले जाते.
३. बजरंग बाणाचे पठण करणे.

**अर्पण:**

१. शनिवारी भगवान हनुमानाला कुंकू आणि मोगऱ्याचे तेल अर्पण करा.
२. त्यांना लाडू किंवा बुंदी अर्पण करा.

**इतर:**

१. हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घ्या आणि त्यांची पूजा करा.
२. राम मंदिरात जाऊन, भगवान हनुमानाच्या कपाळावरील कुंकू घेऊन ते माता सीतेच्या चरणी अर्पण करा आणि आपल्या इच्छा पूर्ण होण्यासाठी प्रार्थना करा. थोडक्यात सांगायचे झाल्यास, शनिवारी भगवान हनुमानाची पूजा केल्याने भक्तांना शनिदेवाचा आशीर्वाद आणि हनुमानाचे संरक्षण, दोन्ही प्राप्त होते.


# पंढरपुरातील भागवत कथाकारांची परंपरा


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीक्षेत्र पंढरपूरला भागवत कथाकारांची भव्य दिव्य अशी ज्ञानपरंपरा आहे. ही साधना वर्षानुवर्ष चालत आलेली आहे. आजही पंढरपुरात असलेली पुढील पिढी अखंडित भागवत साधना करीत आहे. पंढरपूरला लाभलेल्या भागवत कथाकारांची परंपरा खूप जुनी असून त्याची सुरुवात तसेच त्यांचा इतिहास फारसा ज्ञात नाही. अखंडितपणे ३५ वर्षे आपल्या रसाळवाणीने ज्यांनी पंढरपुरात, महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर भागवत कथेची भगवी ध्वजा फडकवत ठेवली असे आदरणीय वै. भागवताचार्य वा.ना.उत्पात यांच्या श्रीमद्भागवत कथा रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी त्यांनी पंढरपुरातील भागवत कथाकरांचा इतिहास संक्षिप्तपणे मांडला.

### १) भागवत्तोत्तम वे. शा.सं. कै. गोपाळशास्त्री गोरे

गुरुवर्य गोपाळ शास्त्री गोरे हे पांडुरंगाचे पुरोहित असलेल्या बेणारे कुळात जन्मले. त्यांचे वडील वै. पांडुरंग बुवा हे श्रीमद भागवताचे अखंड पारायण करीत होते. प्रत्येक अध्ययाचे १०८ प्रत्येक स्कधांचे १०८ संपूर्ण भागवताची १०८ पारायणे केली. आयुष्यभर त्यांनी भागवताची संहिता वाचली. प्रभुदत्त ब्रह्मचारी यांना हे कळल्यावर त्यांनी पांडुरंग बुवा यांना उचलून खांद्यावर घेतले व नाचविले अशा भागवत भक्ताच्या पोटी गोपाळशास्त्री जन्मले. त्यांचे शिक्षण आरंभी हरिपूरकर शास्त्री, पाठशाळेत नंतर काशीत वासुदेवाचार्य यांच्याकडे झाले. त्यानंतर पंडितप्राण भगवानशास्त्री यांच्याकडे झाले. ते वैदिक, घनपाठी, धर्मशास्त्र पंडित होते.त्यांनी सावदेकर शास्त्री यांना गुरु करून भागवताचे अध्ययन केले. त्यांनी ६५ वर्ष भागवत सांगितले. पंढरीत ते धुंडा महाराज यांच्या मठात चातुर्मासात भागवत सांगत. त्यांनी भागवताचे शेकडो सप्ताह विविध गावी केले. भागवत त्यांना मुखोद्गत होते. त्यांच्या घरी ज्ञानाचे सदावर्त होते. त्यांनी अनेकांना भागवत शिकविले. त्यांच्याकडे रंगनाथ महाराज परभणीकर, भानुदास महाराज देगलूरकर, चैतन्य महाराज देगलूरकर, चंद्रशेखर महाराज देगलूरकर, पाठक गुरुजी, हरिभाऊ पाटील वगैरे अनेक महाराज भाष्यग्रंथ शिकायला येत होते. त्यांनी वेद, उपनिषद, भागवत महाकाव्य, धर्मसिंधू, शंकराचार्यांची सौंदर्यलहरी असे अनेक ग्रंथ शिकविले.गोपाळशास्त्री हे वैदिक, पंडित व वेदांती होते. पण रुक्ष नव्हते. भागवत सांगताना त्यांचे अष्टसात्विक भाव दाटून येत. कंठ दाटून येई. पाच मिनिटे शब्द फुटत नव्हता.डोळ्यातून अश्रूधारा वाहत. रासक्रीडा सांगताना तर ते असे रंगून जात की जणू कृष्ण व गोपी त्यांच्यासमोर नाचत आहेत. गोपी गीतावर त्यांचे प्रभुत्व होते. ते सांगताना करूण रसाचा वर्षाव होत होता. भागवतातील "जन्माद्यस्य यतः" या श्लोकावर वा वेदस्तुतीवर बोलताना इतके क्लिष्ट व दुर्बोध श्लोक ते सहज सोपे करून सांगत. त्यांचे जीवनच भागवतमय झाले होते. एकादशीला त्यांचे मौन असायचे, पण त्यादिवशी अपवाद म्हणून ते भागवत सांगायचे व भागवत शिकवायचे. त्यांचे वडील त्यांना अंतसमयी म्हणाले, मी तुला धन, संपदा काही





ठेवली नाही. फक्त भागवत ठेवले आहे. त्याची सेवा कर तुला काहीही कमी पडणार नाही". त्यांनी जन्मभर भागवत सांगितले,शिकवले माझ्यासारखे अनेक शिष्य तयार केले. भागवत ही त्यांचे उपजीवन होते. गावोगाव त्यांनी भागवताची शेकडो सप्ताह केले. ६५ वर्ष जणू काही भागवत यज्ञच केला. भागवताची संहिता इतके वेगाने वाचित की ऐकणाऱ्याला पाने उलटावी लागतं. सप्ताहात रोज ५० अध्याय वाचावे लागतात. त्या वाचनासाठी साडेचार ते पाच तास लागतात, पण ते तीन तासात पन्नास अध्याय मोठ्याने वाचत. एवढा संहिता वाचनाचा त्यांचा वेग होता. भागवत वाचता वाचता त्यांचा देह भागवतमय झाला होता. त्यांचा संस्कृत विद्वान म्हणून महाराष्ट्राचा शासनाने १९६९ मध्ये गौरव केला. पंढरपूर येथे ही त्यांचा नागरिक सत्कार झाला. त्यांना मानपत्र देण्यात आले. बिजवाडा येथे द्रविडशास्त्रींच्या अध्यक्षतेखाली जी शास्त्रीचर्चा झाली. त्यात त्यांनी मध्यस्थ म्हणून काम केले. अनेक यज्ञांचे त्यांनी पौरोहित्य केले. त्यांनी ग्रंथ थोडेच लिहिले ते मौलिक आहेत. गोपीगीतावर त्यांनी एक छोटे पुस्तक लिहिले. 'ज्ञानेश्वरीतील नमनाचे शब्द' या पुस्तकाचे संपादन केले. 'जीवन मुक्ती विवेक' हे श्लोकबद्ध संस्कृत पुस्तक लिहिले. हरीसुरी यांचा भागवताच्या दशम स्कधावरून ५००० श्लोकांचा एक उत्कृष्ट ग्रंथ आहे. त्यात श्लेष, रूपक, उत्प्रेक्षा यांची रेलचेल आहे. तो संस्कृत ग्रंथ जाणकारांनाही कळत नाही. गोपाळशास्त्रींनी त्यातील श्लेष उलगडून दाखवण्यासाठी त्याचे मराठी भाषांतर केले. भागवताचा अभ्यास करणाराला "भक्तिरसायन" या ग्रंथाचा मराठी अनुवाद म्हणजे अमृतकुंभ आहे. गोपाळशास्त्री यांच्या इतकी भागवताची सेवा क्वचितच कोणी केली असेल. त्यांच्या स्मृतींना विनम्र वंदन.

### २) पंडित प्रद्युमनाचार्य केशवाचार्य वरखेडकर

उत्तरादि मठात भागवताची परंपरा सुरू करणारे पंडित प्रद्युम्नाचार्य केशवाचार्य वरखेडकर. मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील वरखेड या गावचे. त्यांचा जन्म १८८० पौष शुद्ध पंचमी या दिवशी झाला. वडील श्रीमद् भागवत सांगत. प्रद्युम्नाचार्य श्रेष्ठ व्याकरणकार पंडित म्हणून प्रसिद्ध होते. आचार्यवर श्री सेतूरामाचार्य यांच्याकडे शिक्षण घेतले. श्रीमद् भागवत प्रद्युम्नाचार्य यांचा जीव की प्राण झाले. कार्तिक शुद्ध एकादशीला पहाटे चार वाजता भागवत ग्रंथ पारायणाला सुरुवात करीत व द्वादशीला पहाटे पारायण संपवित.सत्यध्यानातीर्थ श्रीपाद यांचे सांगण्यावरून ते पंढरपूरला आले. त्यांचे धाकटे बंधू नरसिंहचार्य हे त्यांचे समवेत होते. श्रीपाद यांच्या सांगण्यावरून या दोघा बंधूंनी नदीपलीकडे पूर्ण प्रज्ञमत्तोंन्नहिनी पाठशाळा सुरू केली.१९२५ ते १९६६ पर्यंत पाठशाळा चालवली. त्यांची पत्नी देखील या शाळेत तीनशे विद्यार्थ्यांना संस्कृत श्रीमद् भागवत शिकवत होत्या. वेद व्यास एरी त्यांचे जनार्दनाचार्य, वामनाचार्य हे भाऊतसेच अनंत नारायण काशीकर व त्यांचे भाऊ पुरुषोत्तमाचार्य वेदव्यास रामाचार्य मुद्गुलकर, वादीचार्य कृष्णाचार्य वरखेडकर, प्रल्हाद, निंदाचार्य, उमर्जी रामाचार्य उमर्जी,नरसिंहचार्य उमर्जी हे तिन्ही बंधू,, रामचंद्र शास्त्री डोंगरे महाराज, ह.भ. प. बापूसाहेब चातुर्मास्ये महाराज, गोविंदाचार्य केसरी जहागीरदार निलंगा, वासुदेवाचार्य अपसिंगेकर, सदानंद गुरदा, पंडित भगवानशास्त्री सोनपेठ, प्रल्हादाचार्य पाच्छापूर असे नामांकित भागवताचार्य या पाठशाळेत शिकून तयार झाले.

या सर्वांनी पंढरपुरात शिक्षण घेऊन या क्षेत्रात भागवताची पारायण व सप्ताह सेवा केली आहे. प्रद्युम्नाचार्यांचे सुपुत्र पंडित श्री व्यंकटेश तथा बाळाचार्य वरखेडकर यांनी या शाळेत शिक्षण घेऊन भागवत सेवा केली आहे. अग्निहोत्र व्रत चालवत होते. तर्कतीर्थ कलकत्ता, वेदांताचार्य काशी, मीमांसातीर्थ काशी असे विद्यापीठांचे पुरस्कार त्यांनी मिळविले. बाळाचार्यांचे वडील प्रद्युम्नाचार्यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी १९६७ च्या महापुराच्या वेळी निधन पावले. . नंतर बाळाचार्यांनी या सर्व परंपरा चालू ठेवल्या. बाळाचार्यांचे मित्र पंडित गोपाळचार्य माहुली यांनी पंढरपुरात नदीपलीकडे सत्यध्यान विद्यापीठ काढले. तेथे सर्व संस्कृत धर्मग्रंथाचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिली जाई. १९८९ मध्ये पंडित बाळाचार्य स्वर्गवासी झाले. त्यांचे थोरले चिरंजीव पंडित भिमाचार्य व त्यांचा मुलगा नरसिंह यांनी श्रीमद् भागवत कथा सांगण्याची परंपरा चालू ठेवली.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)